दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.१७ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ८७ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 17 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 87 • Pages 4 • Rate 4 Rs


## काँग्रेसने आत्मपरीक्षण करणे गरजेचे

**मुंबई–** बिहार निवडणुकीच्या निकालांवर देशभरात चर्चा सुरू असताना, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी काँग्रेसच्या अंतर्गत गोंधळ, चुकीचे अंदाज आणि अपयशी रणनीतीवर थेट बोट ठेवले आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना चव्हाण यांनी पक्षाला आरसा दाखवणारे वक्तव्य केले असून, त्यांनी काँग्रेसच्या सल्लागारांच्या निर्णयक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मी बिहारला गेलो नाही, पण संपूर्ण राज्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. तसेच काँग्रेसच्या सल्लागारांनी दिलेले अंदाज वास्तवापासून दूर होते. आपल्याकडे १९ जागा होत्या, त्या २१ किंवा २२ झाल्या असत्या, अगदी १७-१८ झाले असते तरी ठीक, पण निवडक ३० जागा लढल्या असत्या आणि राजदला ४० जागा देण्याची भूमिका घ्यायला हवी होती. तसेच जागावाटपात उदारमतवादी भूमिका घेतली असती तर जास्त जागा मिळू शकल्या असत्या, असेही चव्हाण यांनी म्हटले.

# एसटी महामंडळाचा विद्यार्थ्यांसाठी निर्णय शालेय सहलीसाठी 'एसटीच्या' नवीन बसेस

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती





**मुंबई (वृत्तसंस्था)–**'स्वस्त आणि सुरक्षित' प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा-महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी प्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की, शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या एकूण भाड्यामध्ये ५०% टक्के सवलत देते. त्यामुळे अतिशय मापक दरामध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो.अर्थात, यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्यभरात असलेल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा- महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान राज्यभरातील विविध शाळा- महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९ हजार ६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा (प्रतिपुर्ती रक्कमेसह ) महसूल प्राप्त झाला होता.यंदा देखील प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा-महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात बाबत आवाहन करण्यात येत आहे. आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा - महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी आवाहन करीत आहेत.

# तळोदा नगरपरिषद निवडणुकीसाठी नगराध्यक्षपदासह विविध प्रभागातून दिनांक १६ रोजी ३४ अर्ज दाखल!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**




तळोदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून,दिनांक १६ रोजी नगराध्यक्ष पदासाठी ५, तर विविध प्रभागांसाठी २९ असे एकूण ३४ अर्ज दाखल झाले आहेत. अनेक दिग्गजांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत. नगराध्यक्ष पदासाठी एकूण पाच अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये भाजपच्या दोन उमेदवारांनी पक्ष आणि अपक्ष अशा दोन्ही पद्धतीने अर्ज भरल्याचे दिसून येते. वाणी शशिकांत जगन्नाथ यांनी भाजप आणि अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. परदेशी अजय छबुलाल यांनी देखील भाजप आणि अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. क्षत्रिय हितेंद्र सरवरसिंग यांनी शिवसेनेकडून अर्ज दाखल केला आहे. विविध प्रभागांसाठी एकूण २९ अर्ज दाखल झाले आहेत, ज्यात भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. शिवसेना मधून पाडवी रोनक नरेश यांनी अर्ज दाखल केला. खाटीक विकास सरवरसिंग, राणे गणेश निंबा आणि वंजारी निशा विनोद,पाडवी तनुजाबाई नरेश हेही शिवसेनेचे उमेदवार आहेत. भाजपकडून सूर्यवंशी सुचेता जितेंद्र, डांबरे हेमलता विलास, अन्सारी सानिया कलीम, साठे ज्योती अंबालाल, चौधरी सारिका कैलास, चौधरी कैलास प्रभाकर, पाडवी वसूबाई विजयसिंह, सोनार आनंद महेंद्र, चौधरी सुभाष धोंडू, मेहता नीलाबेन जगदीशचंद्र, चव्हाण नंदनी योगेश, राणे सुवर्णा पंकज, राणे पंकज भालचंद्र, माळी अपर्णा संजय आणि माळी निमेश्चंद्र मगनलाल अशा अनेक प्रमुख उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. महाले जयश्री हंसराज आणि येवले भूषण रमेश यांनी भाजपसोबतच अपक्ष अर्जही दाखल केले आहेत. तर पवार अरुणा भरत (काँग्रेस), ठाकरे प्रकांत प्रकाश (काँग्रेस) आणि पाडवी अंजना आनंद (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# प्रा.अशोक घोडके यांना पीएचडी पदवी प्रदान



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील ग्रंथपाल अशोक माणिकराव घोडके यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात पीएच डी पदवी प्रदान केली.या यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील,खा. रजनीताई पाटील,संस्थेचे सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे,सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.बी.पाटील,डॉ. हनुमंत सौदागर,श्रीकांत लुंगारे,प्राध्यापक वृंद, शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे.

त्यांनी डॉ.दया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान एक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत बालदिन साजरा



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत दि.१४ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन करण्यात आले व बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.पंडीत जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला.त्यांचे पंडीत जवाहरलाल मोतीलाल नेहरू असे नाव होते.ते भारतातील वसाहत विरोधी राष्ट्रवादी,धर्म निरपेक्ष मानवतावादी, सामाजिक लोकशाही वादी आणि लेखक होते. ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते होते.भारत देश १९४७ रोजी स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे ते पहिले पंतप्रधान होते.त्यांनी भारताचे जवळपास १६ वर्षं पंतप्रधान म्हणून काम केले.त्यांनी लोकशाही, धर्मनिरपेक्षता,विज्ञान, तंत्रज्ञानाचा प्रचार केला. त्यांनी भारताला शीत युद्धाच्या दोन गटांपासुन मुक्त केले.त्यांच्या हयाती पासुन पंडीत हे त्यांच्या नावापुढे भारतात लावले जात होते.पंडीत नेहरूंना लहान मुले खुप आवडत होती.लहान मुले त्यांना चाचा नेहरू म्हणत असायचे.पंडीत नेहरू यांच्या जयंती दिवशी बालदिन साजरा केला जातो.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेचे प्राथमिक पदवीधरशिक्षक डॉ.श्री.मुळे रामकिशनसर यांनी सविस्तर माहिती दिली.शिक्षक श्री.आकश लोंढे सर,राहुल बचुटे सर, आबासाहेब धपाटे सर, श्री संदीप ठोंबरे सर, शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी काळे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व आभार श्री.आकाश दत्तु लोंढे सर यांनी मानले.या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक,शिक्षिका,ट्रेनी शिक्षिका,शापोआ कामगार,विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षण प्रेमी उपस्थित होते.

# शिवा संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्षपदी रविराज होळगे बेरळीकर यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**



शिवा संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्ष पदी रविराज होळगे यांची एकमताने निवड करण्यात आली असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे. कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले रविराज होळगे हे शिवा संघटनेचे निष्ठावान आणि सक्रिय पदाधिकारी असून, संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक उपक्रम यशस्वी रित्या राबवले आहेत.

महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती लोहा तालुक्यात त्यांनी भव्य आणि दिमाखात साजरी करून समाजात ऐक्य, संस्कार आणि प्रबोधनाचा संदेश दिला होता. तसेच विविध सामाजिक आणि संघटनात्मक कार्यक्रमांमध्ये त्यांनी दाखविलेल्या नेतृत्वगुणांमुळे त्यांचा लौकिक वाढला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊनच संघटनेच्या उच्च पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे.या महत्त्वपूर्ण निवडी प्रसंगी शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सर, शिवा संघटनेचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस धन्यकुमार शिवनकर, सेवा जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते विठ्ठल ताकबिडे सर आणि अनेक मान्यवर कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती.

रवी होळगे हे शिव-पार्वती समूहाचे उद्योजक असून समाजातील विविध घटकांमध्ये मिळवलेले त्यांचे संपर्क, बाजारपेठेची जाण आणि जनहिताचे भान यामुळे त्यांची कामगिरी विशेषत्वाने उल्लेखनीय ठरते. संघटनेच्या पुढील कामकाजात तालुक्याची कार्यक्षमता आणि विस्तार वाढवण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचा विश्वास वरिष्ठांनी व्यक्त केला आहे.रविराज होळगे यांची तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, आगामी काळात लोहा तालुक्यात शिवा संघटनेचे कार्य अधिक प्रभावी आणि गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नांदा तांडा-चारू तांडा रस्ता कामात मोठा गैरव्यवहार? कंत्राटदारावर महसूल बुडविणे

दैनिक वादळ वार्ता

**सोयगाव । प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील नांदा तांडा ते चारू तांडा या नवीन रस्त्याच्या कामात मोठ्या गैरप्रकारांचा गंभीर आरोप झाला आहे. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ह्युमन ब्रिक्स मिशन, सोयगाव तालुका शाखेने तहसीलदारांना दिलेल्या तक्रार अर्जात शिवसाई कन्स्ट्रक्शन कंपनीवर शासनाचा महसूल बुडविणे, अवैध मुरूम उत्खनन आणि वृक्षतोड केल्याचा आरोप केला आहे.

तक्रारीनुसार, या रस्त्याचे काम २०२५ मध्ये सुरू झाले असून कंपनीने महसूल विभागाकडून फक्त १०० ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी घेतली होती. मात्र प्रत्यक्षात १५०० ते २००० ब्रासपर्यंत अवैध मुरूम काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासोबतच सागवान, लिंब यांसह अनेक झाडांची विनापरवाना तोड करण्यात आल्याचेही नमूद केले आहे. स्थानिक पत्रकारांच्या माहितीनुसार, गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर अजिंठा वनपरिक्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी २५ ऑक्टोबर २०२५ रोजी पंचनामा केला. त्यानंतर प्रकरण दडपण्यासाठी संबंधित कंपनीने २८ ऑक्टोबरला ५०० ब्रास मुरूम उत्खननाची नवीन मागणी केली असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

संपादकीय

# निष्काळजी पणाचा स्फोट



श्रीनगर नौगाम स्फोटात ९ जण ठार, तर ३२ जण जखमी झाले. लाल किल्ल्याच्या समोर झालेल्या बॉम्बस्फोटाच्या बरोबर पाचव्या दिवशी हा स्फोट झाला. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या संयुक्त सचिव आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या पोलीस महासंचालकांनी या स्फोटाला अपघाती म्हटले असले तरीही हा स्फोट भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेला धोका म्हणून समोर आला आहे हे निश्चित. गृह मंत्रालयाने हा दहशतवादी हल्ला नाही असे म्हटले असले तरीही सुरक्षाकर्मी कसे निष्काळजीपणे वागून आपले आणि इतरांचेही जीव धोक्यात घालतात असे या घटनेवरून लक्षात आले आहे. स्फोट इतका भीषण होता की, त्या स्फोटाचा आवाज एक किलोमीटरपेक्षाही जास्त अंतरावर ऐकू आला. पण या घटनेनंतर आता अनेक बाबी समोर आल्या आहेत. फरिदाबाद येथे स्फोटके मिळतात. उरलेल्या दहशतवाद्याच्या साथीदारांना शोधण्याचे काम सुरू ठेवले असते, तर लाल किल्ल्याच्या जवळ झालेल्या स्फोटात अनेकांचा जीव गेला नसता आणि त्यानंतर हा नौगाम स्फोटाची घटना घडली नसती. हा स्फोट जरी अधिकारी स्तरावरून अपघाती म्हटला गेला असला तरीही तो तसा नव्हता. कारण त्यात सुरक्षाकर्मींची बेपर्वाई आणि ढिसाळपणा कारण होता हे यातून स्पष्ट झाले आहे. मुळात फरिदाबादमध्ये सापडलेली स्फोटके काश्मीरमध्ये नेण्याची काहीच गरज नव्हती. फरिदाबादमध्ये ती निकामी करण्यात आली असती, तर ९ जणांचे जीव गेले असते ते गेले नसते. फरिदाबाद येथे सापडलेल्या स्फोटकांची हाताळणी करताना स्फोट झाला असे पोलिसांचे म्हणणे आहे. याचा अर्थ पोलिसांना स्फोटके कशी हाताळायची याचे प्रशिक्षण नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होतो. आता नौगाम येथील स्फोट स्थळ माध्यमांचे आकर्षण केंद्र झाले आहे. नौगाम स्फोट ही अलीकडच्या काळात पोलीस ठाण्यात झालेल्या सर्वात विनाशकारी स्फोटांपैकी एक आहे असे बोलले जाते. केवळ जीव गमावले, कुटुंबे उद्ध्वस्त झाली आणि घरांचे नुकसान झाले एवढ्यापुरती ही गोष्ट थांबणारी नाही, तर वेदनादायक बाब म्हणजे दहशतवादी तपासादरम्यान घडलेली ही घटना आहे. एका व्हाईट कॉलर मोड्यूलचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आणि तो आनंद फार काळ टिकला नाही, तर तपासादरम्यान हा स्फोट होऊन नऊ जणांचा जीव गेला आहे.स्थानिक अधिकाऱ्यांच्या समर्पण आणि दृढ निश्चयामुळे एक मोठा दहशतवादी कट उधळून लावण्यात आला पण फरिदाबाद स्फोटकांच्या तपासातून मिळवलेले ज्वलनशील पदार्थांच्या बाबतीत जी अक्षम्य ढिलाई आणि निष्काळजीपणा केला गेला त्यामुळे या कष्टसाध्य यशावर पाणी पडले आहे. डीजीपींनी या प्रकारात दहशतवादाची शक्यता फेटाळून लावली आहे आणि त्यामुळे हा दिलासा असला आणि अफवांना पसरू दिले नाही, तरीही अवघड प्रश्न ते लपवू शकलेले नाही. या घटनेनंतर काही प्रश्न नव्याने उपस्थित झालेत. स्फोटानंतर करण्यात यावयाच्या उपाययोजना आणि प्रक्रियात्मक त्रुटींचे गांभिर्य स्फोटाच्या प्रमाणावरून स्पष्ट होते. नौगाम पोलीस ठाण्याचे नुकसान झाले आणि लगतच्या इमारती उद्ध्वस्त झाल्या, इतक्या मोठ्या प्रमाणात स्फोटके लोकवस्तीच्या वर्दळ असलेल्या परिसरात कशी साठवण्यात आली आणि स्फोटके ज्या भागात होती त्या भागाचे फोरेन्सिक सॅम्पलिंग का केले गेले नाही असे दोन मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. या स्फोटात जी मनुष्यहानी झाली आहे त्यावरून हे सूचित होते की, स्फोटकांची साठवणूक, पृथःकरण आणि मानक पद्धतीचे व्यवस्थित पालन केले गेले नाही. स्फोटकांची हाताळणी यशस्वीपणे पार पाडली गेली नाही. स्फोटके वाहून नेण्याची काळजी व्यवस्थित का घेतली गेली नाही हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. डीजीपींनी स्पष्ट केले आहे, की कोणताही गैरप्रकार झाला नव्हता. पण प्रणालीगत अपयशाचा हा अभाव आहे असाही त्याचा अर्थ होऊ शकतो. या घटनेची विस्तृत आणि तपशीलवार चौकशी झाली पाहिजे. स्फोटके वाहून नेण्यापासून ते साठवणुकीपर्यंत प्रोटोकॉल पाळला गेला की नाही आणि त्यात जर काही व्यत्यय आला असेल, तर त्यास कोण दोषी आहे याची चौकशी झाली पाहिजे. प्रत्येक जीव मौल्यवान असतो. त्याचे मूल्य कशातही करता येणार नाही, जे गेले त्यांच्या कुटुंबीयांना आता भावनिक विध्वंस आणि अनिश्चिततांनी भरलेले जीवनाला सामोरे जावे लागणार आहे हे वास्तव आहे. त्यांच्या पुनर्वसनाला सरकारने हातभार लावला पाहिजे. जम्मू-काश्मीर पोलिसांनी दहशतवादी मोड्यूल उद्ध्वस्त केले हे त्याच्या कामगिरीला साजेसेच झाले. नौगाम स्फोट हा आवश्यक धडा आहे आणि तो आपल्या सुरक्षाकर्मीयांना तितकाच आवश्यक आहे जितका की दहशतवाद्यांना उद्ध्वस्त करणाऱ्यांना त्याचे प्रशिक्षण आवश्यक आहे. नौगाम स्फोट प्रकरणी आपल्या सर्वांनाच एक धडा मिळाला आहे तो म्हणजे जबाबदारी सुनिश्चित करणे, एसओपीजचा पुनर्विचार करणे आणि एजन्सी एजन्सीमध्ये सहकार्य करणे आणि नगारिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे हे समजून घेणे आजच्या काळाची गरज आह. कारण काश्मीरच काय पण कुठेही स्फोट घडतच रहाणार आणि त्यामुळे स्फोटांनंतरच्या उपाययोजना कशा करायच्या आणि त्यासाठी काय खबरदारी घ्यायची याची माहिती संबंधी यंत्रणेला असली पाहिजे. मोठा दहशतवादी हल्ला रोखण्यासाठी या नऊ जणांनी आपापल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. त्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये आणि भविष्यात अशा कोणत्याही घटनेला चालना मिळू नये. या दुर्घटनेपासून हा धडा घेतला तरी पुरेसे आहे. इतक्या महत्त्वाच्या स्फोटकांची हाताळणी सामान्य पोलिसांकडून होऊ नये. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानक संचालन प्रक्रिया म्हणजे स्टॅंडर्ड आपरेटिंग प्रोसिजर पार पाडताना प्रत्येक वेळेला या प्रक्रियेचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. आता काश्मीरमध्ये या घटनेवरून राजकारण सुरू झाले आहे. पण त्याला काही अर्थ नाही. बिहारच्या निकालाने विरोधक इतके उद्ध्वस्त झाले आहेत, की या घटनेवरून काही प्रतिक्रिया देण्याचीही त्यांची तयारी नाही.

# धरती आबा भगवान बिरसा मुंडा आदिवासी अस्मितेचे प्रतीक

धरती आबा भगवान बिरसा मुंडा हे अभिमानी आणि अदम्य भारतीय अस्मितेचे शाश्वत प्रतीक आहेत, ज्यांचे जीवन आपल्याला आठवण करून देते की जोपर्यंत समाज त्याच्या संस्कृतीत रुजलेला असतो तोपर्यंत संघर्षाची ज्योत कायम राहते. त्यांचा प्रवास सत्य, स्वाभिमान आणि दृढनिश्चयाच्या क्षमतेची आठवण करून देतो, तसेच दाखवून देतो की, सामान्य व्यक्ती देखील असाधारण गोष्टी साध्य करू शकतात आणि इतिहास घडवू शकतात. त्यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त, आपण भारतातील प्रत्येक आदिवासी समुदायाला सन्मान, शिक्षण, संधी आणि स्वाभिमानाने समृद्ध करण्याची प्रतिज्ञा करूया. शेवटी, समाजातील प्रत्येक सदस्य देशाच्या प्रगतीत सहभागी होईल तेव्हाच खरा विकास होईल. 'धरती आबा' भगवान बिरसा मुंडा यांना माझ्याकडून भावपूर्ण श्रद्धांजली. जय जोहर!अनादी काळापासून, भारतीय संस्कृती वसुधैव कुटुंबकम या मार्गदर्शनात्मक भावनेखाली भरभराटीला आली आहे, याचा अर्थ असा की संपूर्ण जग 'एक कुटुंब' आहे. या भूमीचे वैभव फक्त विस्तीर्ण साम्राज्यांपुरते मर्यादित नाही, तर विशाल आणि बहुआयामी समुदायांमध्ये आहे, ज्यांनी अंतर्ज्ञानाने स्वत:चे जीवन घडवले आहे, निसर्ग आणि श्रद्धेशी परोपकारी सुसंवाद साधला आहे. यापैकी, आदिवासी समाज भारतीय पैलूच्या सर्वात प्राचीन आणि हृदयस्पर्शी अभिव्यक्तीला सादर करतो, जेथे भूमातेबद्दल अतूट श्रद्धा आणि स्वाभिमानाचा शोध अखंडपणे एकत्रित दिसून येतो. भारतात असलेल्या आदिवासी समाजामध्ये 'धरती आबा' भगवान बिरसा मुंडा यांनी चमकदार कामगिरी केली आहे. भारतातील आदिवासी समाजाच्या उत्साहाला पुन्हा जागृत करत त्यांचे नाव आज आदिवासी अस्मिता, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्याच्या संघर्षाचे तेजस्वी प्रतीक म्हणून ओळखले जाते. बिरसा मुंडा यांची १५०वी जयंती त्यांच्या श्रद्धा, स्मृती आणि देशासाठी अमर्याद संकल्पाचा भव्य उत्सव आहे. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी सध्याच्या झारखंडमधील उलिहाटू गावात जन्मलेले भगवान बिरसा मुंडा हे एका सामान्य शेतकरी कुटुंबातले होते. तरीही त्यांची दृष्टी आणि बुद्धिमत्ता असाधारण होती. लहानपणापासून त्यांनी नेतृत्व, शिक्षण आणि चिंतन यांचे दुर्मीळ संयोजन दाखवले. जर्मन मिशनरी शाळेत शिक्षण घेण्यासह त्यांनी ब्रिटिश शासक आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धोरणांचे बारकाईने निरीक्षण केले, त्यांना माहीत होते की त्यांचे नियंत्रण फक्त या भूमीवर नाही तर लोकांच्या गुलामगिरीच्या भावनेवर देखील पसरलेले आहे. या अंतर्दृष्टीने त्यांच्यात जागृतीचे प्राथमिक बीज पेरले आणि अखेर ते परिपूर्ण व देवासारखे नेते, सुधारक आणि जनतेसाठी आध्यात्मिक मार्गदर्शक बनले.

'धरती आबा' भगवान बिरसा मुंडा यांनी मातृभूमी आणि महत्त्वपूर्ण संसाधन जसे जमीन, पाणी व जंगल यांचे रक्षण करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी परकीय वर्चस्वाविरुद्ध लढा देण्यासोबत त्याच धैर्याने अन्याय, शोषण आणि सामाजिक असमानतेविरोधात देखील लढा दिला. भूसंपादनाच्या बहाण्याने ब्रिटिशांनी आदिवासी समुदायाच्या वडिलोपार्जित जमिनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना त्यांच्याच मातृभूमीत एकटे सोडले. या महत्त्वाच्या टप्प्यावर, बिरसा मुंडा यांनी घोषणा केली, ''ही पृथ्वी आमची माता आहे; ती कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.'' या जोरदार आवाहनासह, १८९९ मध्ये महान जनक्रांती उलगुलन सुरू झाली, तसेच स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची घोषणा झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली मुंडा योद्ध्यांनी सिंहभूम, खुंटी, तामार, सरवारा आणि बंदगावमध्ये ब्रिटिश राजवटीला आव्हान दिले. त्यांचे आयुष्य फक्त २५ वर्षांचे असताना देखील त्यांचे धैर्य, दूरदृष्टी आणि नेतृत्वाने इतिहासावर अमिट छाप सोडली आणि पिढ्यांना प्रेरणा देत राहिले. बिरसा मुंडा यांचा संघर्ष धर्म, संस्कृती आणि सामाजिक सुधारणांच्या जाणिवेत खोलवर रुजलेला होता. त्यांनी अधीनता फक्त राजकीय नाही तर मानसिक देखील आहे, यावर भर दिला. त्यांनी आदिवासी समाजाला अंधश्रद्धा, ढोंगीपणा, व्यसन आणि सामाजिक विभाजन नाकारण्याचे आवाहन केले, तसेच आध्यात्मिक तत्त्वामध्ये श्रम, सत्य आणि स्वाभिमानाला महत्त्व दिले. त्यांच्यासाठी निसर्ग पवित्र होते; पृथ्वी, पाणी, जंगल आणि पर्वत हे श्रद्धेच्या पवित्र वस्तू होत्या. त्यांनी आधीच इशारा



दिला होता की आपल्या भूमीपासून दूर जाणारा समाज अस्तित्वात नाहीसा होतो, हा संदेश पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या युगात आजही शक्तिशालीपणे दिसून येतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतात १५ नोव्हेंबर हा दिवस आदिवासी गौरव दिन म्हणून घोषित केला तेव्हा हा सन्मान या महान नायकाला मानवदंनेपेक्षा अधिक होता, ते विसरलेल्या इतिहासाला आवश्यक नवसंजीवनी होते, जे देशभावनेला बळकटी देते. हा सन्मान असंख्य आदिवासी प्रमुखांना सन्मानित करतो, ज्यांनी जंगल, पर्वत आणि सीमावर्ती प्रदेशांमध्ये आव्हानात्मक स्थितीत राहून देखील स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाची ज्योत त्यांच्या हृदयात जिवंत ठेवली. २०२५ ला आदिवासी गौरव वर्ष म्हणून घोषित केल्याने हा दूरदर्शी दृष्टिकोन पुढे चालू राहिले, असा दृष्टिकोन, ज्यामध्ये विकास फक्त आर्थिक वाढीमधून नाही तर सांस्कृतिक पुनर्जागरण, प्रतिष्ठा आणि स्वाभिमानाच्या साजरीकरणामधून दिसून येतो.

उत्तर प्रदेशची भूमी आदिवासी परंपरांच्या समृद्ध वारशाची उत्साही प्रतीक आहे. थारू, गोंड, कोल, भुइया, चेरो, खरवार आणि वंतंगिया यांसारखे समुदाय राज्याच्या सांस्कृतिक रचनेत खोलवर रुजलेले आहेत. या समुदायांचे श्रम, लोककला आणि जीवनशैलीमधून 'धरती आबा' यांचा कालातीत उत्साह, निसर्गावरील प्रेम, श्रमाबद्दल आदर आणि मातृभूमीवरील भक्तीची कालातीत भावना दिसून येते. राज्य सरकारने आदिवासी समुदायांच्या कल्याण आणि विकासाला चालना देण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. सोनभद्र, मिर्झापूर, लखीमपूर खेरी आणि बलरामपूर या जिल्ह्यांमध्ये सरकारी आश्रम शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. बलरामपूरमधील इम्लिया कोडेर येथील थारू आदिवासी संग्रहालय त्यांच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन आणि प्रशंसित करते. प्रयागराज महाकुंभ २०२५ मध्ये आदिवासी प्रदर्शनासारख्या व्यासपीठांनी या समुदायांना ओळख आणि आवाज दिला आहे. गोरखपूर, महाराजगंज आणि जवळच्या भागातील वंतांगीया समुदायाच्या पुनर्वसनापासून पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, आरोग्यसेवा आणि घरांच्या तरतुदीपर्यंत प्रत्येक आदिवासी भागात विकास झाला आहे. स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ आपली ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागलेल्या वंतांगीया समुदायाला आता महसुली गाव, मतदानाचा अधिकार, स्वतंत्र ओळख आणि स्वावलंबनाचे साधन म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या परिवर्तनामधून अंत्योदयाची खरी भावना दिसून येते, जे तळागाळातील व्यक्तींना प्रगती करण्यास प्रेरित करते. भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनामधून शिकवण मिळते की, खरे स्वराज्य म्हणजे फक्त राजकीय बदल नाही तर समाजाच्या आत्मविश्वासाचे सक्षमीकरण आहे. त्यांनी दाखवून दिले की, लोक त्यांच्या मूल्यांशी, परंपरांशी आणि संस्कृतीशी जोडलेले असतात तेव्हा देश अधिक सामर्थ्यवान बनतो. त्याच तत्त्वानुसार, उत्तर प्रदेश सरकार प्रत्येक व्यक्तीसाठी आदर, प्रत्येक समुदायासाठी संधी आणि प्रत्येक प्रदेशासाठी समृद्धी सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करते. सर्वोदयाकडे घेऊन जाणाऱ्या अंत्योदयाच्या या दृष्टिकोनामधून 'धरती आबा' यांच्या जीवनाचा अनुभव मिळतो आणि आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या आवाहनामधून ते दिसून येते.

# रेल्वे परिसरातील अनाथ मुलांसाठी आरपीएफचे 'सुरक्षा कवच'

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी, १४ नोव्हेंबर हा दिवस भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. पंडित नेहरू हे असे नेते होते ज्यांनी मुलांवर खूप प्रेम केले. मुलं ही भारताचे उज्ज्वल भविष्य असल्याचे त्यांचे ठाम मत होते. म्हणून या मुलांचे पालन-पोषण, त्यांच्यावर होणारे संस्कार यावर त्यांचा अधिक विश्वास असे. बालदिन म्हटलं की, देशातील, प्रत्येक राज्यातील शाळांमध्ये हा दिवस चिमुकल्यांबरोबर साजरा केला जातो. प्रत्येक बालकाच्या चेहऱ्यावरील हास्य आणि त्या हास्यातली ती चमक बरंच काही सांगते. अनके उद्याने या बालकांसाठी विविध रंगांनी भरलेली असतात. या वातावरणात या मुलांच्या बालपणाचा उत्साह साजरा करण्यासाठी प्रत्येकजण एकत्र येतात; परंतु या उत्सवांमध्येही एक शांत, जागरूक शक्ती अस्तित्वात आहे जी भारतीय रेल्वेवरील मुलांच्या निरागसतेचे रक्षण करण्यासाठी चोवीस तास काम करते. केवळ मुलांना फुगे किंवा मिठाई देऊन या मुलांचे मनोधैर्य वाढवत नाही तर यांचे संरक्षण करण्यास ते नेहमी तत्पर असतात, ते आहे (आरपीएफ) रेल्वे संरक्षण दल, जे केवळ प्रवाशांचे आणि रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्यापेक्षा या मुलांचे संरक्षण त्यांना आसरा देणारे महत्वाचे नायक ठरले आहे.

रेल्वेच्या परिसरात वावरणारी ही अनेक पोरकी मुले आहेत. आरपीएफ या मुलांसह त्यांच्या स्वप्नांचे रक्षण करतात. रेल्वे प्लॅटफॉर्मच्या कोपऱ्यात, पायऱ्यांखाली, वेटिंग रूममध्ये आणि चालत्या गाड्यांमध्ये, हजारो मुलांना या उत्सवाची माहितीही नसते. अनेकदा ही मुले तस्करीचे बळी ठरतात. कोणीतरी अत्याचार करतोय म्हणून त्यापासून सुटका करून घेण्यासाठी तिथून पळून जाणारी मुले दुसऱ्या सापळ्यात अडकतात. स्वत:च्या पोटच्या मुलाला रेल्वे परिसरात सोडून दिलेली, हरवलेली किंवा बालमजुरीसाठी भाग पाडलेली मुले असतात ही. त्यांची निरागसताच हरवलेली असते. अशा मुलांच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य, जगण्याची ऊर्मी, एक आशा, उमेद देणारा हा बालदिन यांच्यासाठी खूप काही देणारा असतो. कोणाच्या तरी मायेची ऊब शोधणारी ही मुले यांच्यासाठी बालदिन हा उत्सव नाही, तर मदतीसाठी दिलेली हाक आहे. या आवाहनाला साथ देणारे, ही हाक ऐकणारे रेल्वे संरक्षण दलाचे (आरपीएफ)



खाकी पोशाखातील पुरुष आणि महिला आहेत.'आरपीएफ' जिथे कर्तव्य आणि प्रेम यांचा संगम होतो. रेल्वे सुरक्षासाठी आरपीएफची ओळख आहे; परंतु अनेकांना आरपीएफ बाल संरक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण योगदान असल्याची माहिती नसते. अनेकदा येथील गर्दी आणि गोंधळ असलेली रेल्वे स्थानके मुलांसाठी धोकादायक क्षेत्र असतात. जिथे ते त्यांच्या कुटुंबांपासून दूर होऊ शकतात, तस्करांना बळी पडू शकतात किंवा स्वतःला संकटात टाकू शकतात. अशावेळी आरपीएफ कर्मचारी केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुढे येत नाहीत, तर या मुलांचे पालक, मार्गदर्शक आणि काळजीवाहक म्हणून देखील त्यांच्या पाठीशी उभे राहतात. १९५७ मध्ये स्थापन झालेले, आरपीएफ मूळत: रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याचे काम सोपवण्यात आले होते. त्यानंतर प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली; परंतु गेल्या काही वर्षांत, देशातील रेल्वे परिसरातून प्रवास करणाऱ्या हजारो संकटग्रस्त मुलांसाठी सुरक्षा कवच ठरले आहे. या मुलांसाठी केवळ रेल्वेच सुरक्षा कवच का ठरते, तर याचे कारण कारण तस्कर, बालकामगार दलाल आणि अपहरणकर्ते अधिकाधिका रेल्वेलाच प्राधान्य देतात. ६७,००० किलोमीटरहून अधिक ट्रॅक, १२,००० हून अधिक गाड्या आणि ७,००० स्थानकांसह, भारतीय रेल्वे वाहतुकीचा एक चमत्कारिक प्रवास आहे आणि दुर्दैवाने, मुलांसाठी असुरक्षित कॉरिडॉर आहेत, येथेच आरपीएफ बाल तस्करी, बालकामगार आणि रेल्वेवरील शोषणाविरुद्ध भारताच्या पहिल्या संरक्षण रांगेत काम करते.

२०१७ मध्ये, भारतीय रेल्वेने आरपीएफ अंतर्गत ऑपरेशन नन्हे फरिश्ते नावाचा एक परिवर्तनकारी उपक्रम सुरू केला, ज्याचा शब्दशः अर्थ छोटा फरिश्ता असा होतो. त्याचे उद्दिष्ट रेल्वे परिसरात संकटात सापडलेल्या मुलांची सुटका करणे, पुनर्वसन करणे आणि त्यांचे संरक्षण करणे आहे. त्याच्या स्थापनेपासून, ऑपरेशन नन्हे फरिश्तेने १.६ लाखांहून अधिक मुलांची सुटका केली आहे, ज्यात हजारो मुलांचा समावेश आहे, ज्यांना मजुरी किंवा अत्याचारासाठी तस्करी करण्यात आली होती. पुनर्वसनासाठी त्यांनी चाइल्डलाइन (१०९८), जिल्हा बाल संरक्षण युनिट्स आणि स्वयंसेवी संस्थांशी भागीदारी केली आहे. प्रमुख स्थानकांवर बाल मदत केंद्रे स्थापन केली आहेत. प्रमुख स्थानकांवर, बाल मदत केंद्रे असुरक्षित मुलांसाठी आश्रयस्थान बनले आहे. रेल्वे संरक्षण दल (ठझऋ), पोलीस, १०९८ आणि स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चालवली जाणारी ही सेवा तत्काळ निवारा, अन्न आणि वैद्यकीय सेवा, बाल संरक्षण प्रणालींशी नोंदणी, बाल कल्याण समित्यांशी संबंध आणि कायदेशीर मदत आणि हरवलेल्या मुलांच्या तक्रारींचा मागोवा घेण्यास पुढे येते. सुटका केलेल्या मुलांना फक्त त्यांच्या ताब्यात दिले जात नाही, त्यांची काळजी घेतली जाते, त्यांना सांत्वन केले जाते. हजारो आरपीएफ कर्मचाऱ्यांना अशा मुलांना कशाप्रकारे समजून घ्यायचे याचे प्रशिक्षण दिले जाते; परंतु प्रत्येकात एक संवेदनशील हुशार कर्मचारी दडलेला आहे. भारतात ४७२ दशलक्षहून अधिक मुले राहतात. त्यापैकी आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित कुटुंबांमधून येतात. वेश्याव्यवसायात विकले जाण्यासह लैंगिक शोषण, जबरदस्तीने भीक मागणे या सगळ्या प्रकाराला आळा घालण्यासाठी रेल्वे नेटवर्क एक योग्य दिशा ठरते. आरपीएफ अशा अनेक पीडितांच्या केवळ रक्षकच नाहीत तर बहीण, माता आणि सल्लागार देखील आहेत. आजही, हजारो मुले अनधिकृतरीत्या मजूर म्हणून राबतात. 'कामगार'या शब्दाचा अर्थही न समजण्याच्या वयात त्यांचे भवितव्य यात गुरफटले जाते. आरपीएफने या हजारो मुलांची सुटका केली. त्यांच्या भूमिकेचे महत्त्व ओळखून, रेल्वे मंत्रालयाने आरपीएफ कर्मचाऱ्यांसाठी विशेष बाल संरक्षण प्रशिक्षण, विशेषतः संवेदनशील भागात अधिक महिला कॉन्स्टेबलची भरती, सीसीटीव्ही, फलक आणि जागरूकता मोहिमांसह स्टेशन पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि जिल्हा बाल कल्याण अधिकारी आणि बाल न्याय मंडळांशी चांगले समन्वय यामध्ये गुंतवणूक केली आहे. भारतीय रेल्वे केवळ वाहतूक नेटवर्क नसून प्रत्येक मुलासाठी एक सुरक्षित कॉरिडॉर आहे.

# सुदृढ बालक-सक्षम भविष्य'कडे वाटचाल: नंदुरबार मध्ये ग्राम बालविकास समिती उपक्रमाने साधला नवा टप्पा

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

आदिवासी विकास विभागांतर्गत नंदुरबार जिल्ह्यामध्ये १५ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झालेल्या ग्राम बालविकास समिती च्या या महत्त्वाकांक्षी पोषण अभियानाने दिनांक १६ रोजी एक महिन्याचा महत्त्वपूर्ण टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. ८४ दिवसांच्या विशेष मोहिमेतील हा पहिला महिना जिल्ह्याच्या दुर्गम भागातील बालकांचे आरोग्य व पोषण सुधारण्यासाठी समुदाय-आधारित सामूहिक प्रयत्नांना बळ देणारा ठरला आहे.सध्या हा उपक्रम जिल्ह्याच्या तळोदा, अक्कलकुवा, मोलगी, पिंपळखुटा, धडगाव, तोरणमाळ आणि खुंटामोडी या सात प्रकल्पांमध्ये प्रभावीपणे राबविला जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश केवळ पोषण स्थिती सुधारणे नाही, तर गावपातळीवर बालकांचे आरोग्य, देखरेख आणि कुटुंबीयांचा सक्रिय सहभाग वाढवून एक शाश्वत पोषणसुरक्षा व्यवस्था निर्माण करणे आहे.

या उपक्रमाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे विविध शासकीय घटकांमध्ये साधलेला समन्वय. ग्राम बालविकास समितीच्या नियमित बैठकांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती, एएनएम, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामप्रतिनिधी एकाच छताखाली येतात.

बैठकांमधील प्रमुख कृती म्हणजे बालकांचे वजन, उंची व मध्य बाहू घेर द्वारे नियमित तपासणी केली जाते. सेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत घरभेटी करून माता-पित्यांना पोषण व आरोग्यविषयक वैयक्तिक सल्ला दिला जातो.बालकांना जीवनसत्त्व 'अ' आणि जंतनाशक गोळ्या यांसारख्या अत्यावश्यक पोषण संसाधनांचे वेळेवर वितरण केले जात आहे.कुपोषणाच्या गंभीर श्रेणीतील बालकांवर या उपक्रमात विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पोषण पुनर्वसन केंद्र मधून घरी परतलेल्या



बालकांचा सातत्याने पाठपुरावा होत आहे.मुलांची भूक व्यवस्थित आहे की नाही, याची नियमित चाचणी घेतली जाते.एएनएम आणि डॉक्टरांकडून नियमित वैद्यकीय परीक्षण केले जाते, तसेच घरी भेटी देऊन पोषण सल्लामसलत केली जाते. यामुळे उपचारांनंतरही बालकांच्या आरोग्यावर सातत्यपूर्ण देखरेख ठेवली जात आहे.

वर्तन-परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'आहार नोंदीची दैनंदिनी' या नाविन्यपूर्ण साधनामुळे मोठा बदल दिसून येत आहे.माता मुलांच्या चार वेळच्या जेवणाची नियमित नोंद या पुस्तिकेत करत आहेत.अंगणवाडी सेविका घरभेटी दरम्यान या नोंदी तपासत आहेत आणि आवश्यक सूचना देत आहेत.या नोंदींचा सामूहिक आढावा नियमित बैठकीत घेतला जातो, ज्यामुळे मातांमध्ये आपल्या मुलांच्या आहाराबद्दल अधिक जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे.

### एक महिन्याचे ठोस परिणाम

हा समुदाय-आधारित उपक्रम जिल्ह्यासाठी अत्यंत परिणामकारक ठरला आहे. गावांमध्ये बालकांच्या पोषणाबद्दलची जागरूकता लक्षणीय वाढली आहे.आरोग्य सेवा देणाऱ्या अंगणवाडी आणि आरोग्य विभागाच्या सर्व घटकांमध्ये उत्कृष्ट समन्वय निर्माण झाला आहे. केवळ शासनावर अवलंबून न राहता, कुटुंबीयांची पोषणविषयक जबाबदारीत वाढ झाली आहे.सॅम बालकांसाठी प्रभावी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा व्यवस्था मजबूत झाली आहे. अंगणवाडी व आरोग्य यंत्रणेच्या मैदानी पातळीवरील कामाची गुणवत्ता सुधारली आहे.नंदुरबार जिल्हा या प्रभावी उपक्रमामुळे समुदाय सहभाग, शासकीय यंत्रणांची समन्वयित भूमिका आणि नियमित आरोग्य तपासणीच्या बळावर 'सुदृढ बालक - सक्षम भविष्य' या ध्येयाकडे सातत्याने आणि आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे.

# माहूर शहरासह तालुक्यात भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
**किनवट प्रतिनिधी**




श्री क्षेत्र माहूर येथे आज क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध सामाजिक, आदिवासी व युवक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील भगवान बिरसा मुंडा चौकात आयोजित कार्यक्रमांत हुतात्मा बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या बलिदान व संघर्षमय आयुष्याचे स्मरण करण्यात आले.

स्थानिक आदिवासी समाज, विद्यार्थी संघटना, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच नगरातील विविध सामाजिक मंडळांनी रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम व परंपरागत नृत्यांच्या माध्यमातून आदिवासी क्रांतीवीराला अभिवादन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

वक्त्यांनी आपल्या भाषणात बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी दिलेला लढा, वनधिकार, स्वाभिमान आणि सत्तेविरुद्ध उभारलेल्या उठावाची माहिती सांगत त्यांच्या विचारांचे महत्व अधोरेखित केले. बिरसा मुंडा हे केवळ आदिवासी नायक नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान आहेत,असे मत अनेक मान्यवरांनी मांडले.

यावेळी मुला-मुलींसाठी इतिहास व आदिवासी संस्कृतीवर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा, तसेच पारंपारिक वाद्यवृंदाचा आकर्षक कार्यक्रम करण्यात आला. अनेक संघटनांनी माहूर तालुक्यातील सर्वच गावात जंगल संरक्षण, शिक्षण आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृती संदेशही दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी ऐक्य, सांस्कृतिक जतन आणि विकासाच्या वाटचालीत बिरसा मुंडा यांचे विचार अनुसरण्याचा संकल्प करून ठिकठिकाणी क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मुबंईच्या सुरक्षेबाबत पोलीस आयुक्ताना दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई प्रतिनिधी**



बांग्लादेशी आणि रोहिंग्यांची घुसखोरी ही मुंबईच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय धोक्याची गोष्ट आहे. खोटे आधार कार्ड घेऊन हे घुसखोर आपल्या देशात येत आहेत, फेरीवाले, भाजीवाले, छोटे विक्रेते म्हणून आपल्यात वावरत आहेत आणि आपल्याच नागरिकांना धमकावत आहेत. आज जर यावर कारवाई केली गेली नाही तर हे घुसखोर संपूर्ण मुंबई काबीज करतील. भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गिरगाव मधील अशाच ८ घुसखोरांची खोटे आधार कार्ड जप्त केले आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी आज मुंबई पोलीस आयुक्त माननीय देवेन भारती जी यांची भेट घेऊन त्यांना पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी निवेदन दिले.

दरम्यान, मालवणी परिसरात मोठ्याप्रमाणात अनधिकृत बांधकामाच्या विरोधातील कारवाईचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. यात नऊ हजार चौरस मीटर जागेवरील अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले आहे. मोठ्याप्रमाणात बांगलादेशी आणि रोहिंगे आढळून आले आहेत. कायदेशीर करवाई झाली असून सुद्धा पाडलेल्या झोपडया पुन्हा पत्र्याच्या शेडच्या स्वरूपात उभ्या करण्याची तयारी येथे सुरु झाले आहे. अधिक तपास करून पोलीस आयुक्तांनी तात्काळ कारवाई करावी, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मागणी देखील मी यावेळी केली.

# अतनुरात ८० टक्के लाभार्थी प्रामाणिकरण

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर प्रतिनिधी**

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्या आदेशान्वये विशेष लाभार्थी प्रामाणिकरण द्वारे दिव्यांग, अपंग, परितक्त्या, विधवा, जेष्ठ नागरिक, वयोवृध्द, निराधार, अंत्योदय रास्त धान्य ग्राहक कार्ड धारक यांचे राजेश लांडगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली व सूचनेप्रमाणे उदगीर विधानसभा मतदारसंघातील अतनूर येथील ८० टक्के लाभार्थी प्रमाणीकरण प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडले. या शिबिरामुळे लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत होण्यास मदत झाली. या शिबिरात लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासण्यात आली आणि त्यांच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या. परंतु ही प्रक्रिया सामान्यपणे शिधापत्रिका आणि सार्वजनिक वितरण प्रणालीशी संबंधित आहे. या शिबिराचा उद्देश आणि कार्यपद्धती नुसार लाभार्थी ओळख आणि प्रमाणीकरण झाले. शिबिरामध्ये लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांची कागदपत्रे तपासण्यात आली. यावेळी माहिती अद्ययावत करणे, शिधापत्रिका आणि संबंधित योजनांशी संबंधित लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता सुधारणे, या प्रक्रियेमुळे सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक प्रभावीपणे चालण्यास मदत होते. सदरील लाभार्थी प्रामाणिकरण करिता पुरवठा विभागातील अधिकारी,



कर्मचाऱ्यांनी दिव्यांग, अपंगाच्या घरोघरी, दारोदारी जाऊन बायोमॅट्रिक तथा मशीनद्वारे लाभार्थी रास्त भाव धान्य कार्डधारकां ची प्रामाणिकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड व तहसीलदार राजेश लांडगे यांच्या विशेष आदेशान्वये व सूचनेप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, तहसीलदार राजेश लांडगे, निरीक्षणाधिकारी अर्पण राऊत, पुरवठा सहाय्यक रविचंद्र गाजरे, पुरवठा ऑपरेटर माधव सातापुरे, कोंडिबा गवळे, विशाल नाटके, वैजनाथ पवार, महाराष्ट्र शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थेचे प्रदेशाध्यक्ष बी.जी. शिंदे अतनूरकर, रास्त भाव धान्य दुकानदार शिवाजी नारायण कदम माजी सैनिक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रदिप भगत यांचे उल्लेखनीय यश-महाराष्ट्रात ६६८ वा क्रमांक

दैनिक वादळ वार्ता
**बिलोली** प्रतिनिधी

किनवट तालुक्यातील आंजी जि. नांदेड येथील प्रदिप लक्ष्मीबाई मुकिंदा भगत यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर विद्युत सहाय्यक (Mahavitaran) या प्रतिष्ठित भरती परीक्षेत महाराष्ट्र राज्यात ६६८ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, प्रदिप भगत यांनी कोणत्याही कोचिंग क्लासचा आधार न घेता, पूर्णतः स्वतःच्या अभ्यासावर व परिश्रमावर हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील मर्यादित साधनसुविधांमध्ये त्यांनी दाखवलेली चिकाटी, अभ्यासावरील निष्ठा आणि जिद्द हे तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



त्यांच्या या यशामुळे आंजी गावासह संपूर्ण किनवट तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थ, मित्रपरिवार, शिक्षकवर्ग आणि नातेवाईकांकडून प्रदिप भगत यांचे कौतुक होत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रदिप भगत यांनी सांगितले की, मेहनत, सातत्य आणि स्वतःवरील विश्वास असेल तर कोणतेही उद्दिष्ट अशक्य नाही. त्यांच्या या विचारांमुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळत आहे

# बिहारमधील अभूतपूर्व विजयाबद्दल प्रदेश भाजपाच्या वतीने विजयोत्सव

## बिहारमध्ये पंतप्रधान मोदींची जादू कायम; मतदारांनी काँग्रेसच्या 'फेक नरेटिव्ह' ला नाकारले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

बिहार विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकारने विरोधकांचा सुपडा साफ केल्यानंतर प्रदेश भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत विजयोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी श्री.चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, जेडीयु प्रमुख व बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, एनडीएतील घटक पक्षांच्या नेत्यांचे प्रदेश भाजपाच्या वतीने अभिनंदन केले. 'एनडीए' ला भरभरून मते देऊन विजय प्राप्त करून देणा-या मतदारांचेही श्री. चव्हाण यांनी आभार मानले. बिहार तो झांकी है, मुंबई अभी बाकी है...भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देत, ढोल ताशे वाजवत जल्लोष करण्यात आला. यावेळी आ. कुमार आयलानी, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, अमरजित मिश्रा, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी यांच्यासह भाजपाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, बिहार विधानसभा निवडणूक निकालात पंतप्रधान नरेंद्र





मोदी यांची जादू कायम राहिली असल्याचे स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, नितीश कुमार यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकारने मागील काही वर्षांत ताकदीने केलेल्या विकासकामांमुळे समाजातील सर्व घटकांची उन्नती झाली. त्यामुळेच बिहारच्या जनतेने राष्ट्रीय लोकशाही आघाडीला कौल दिला. बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दोन आकडी मजल देखील मारता आली नाही त्यामुळे त्यांची स्पर्धा ही अपक्षांशी होती असा टोला ही त्यांनी लगावला.

श्री.चव्हाण म्हणाले की, निवडणूक निकालाचे चित्र पाहता काँग्रेसच्या फेक नरेटिव्ह ला जनतेने सपशेल नाकारले आहे. प्रत्येक निवडणुकीआधी फेक नरेटिव्ह पसरवण्याचा पायंडा राहुल गांधी यांनी पाडला होता. बिहार निवडणुकीत व्होट चोरी चे फेक नरेटिव्ह पसरवून रान माजवण्याचा प्रयत्न केला. मात्र राहुल गांधी यांचे आरोप किती बिनबुडाचे आणि फुटकळ असतात हे जनतेने सिद्ध केले आहे. मतदार यादी सखोल पडताळणी अभियानाच्या (एसआयआर) च्या आकडेवारीतून राहुल गांधी बिनबुडाचे आरोप करत होते हे स्पष्ट झाले होते. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकारच्या विकासाच्या राजकारणामुळे आज देशातील प्रत्येक घटकाला न्याय मिळत आहे. मोदी सरकारच्या धोरणांमुळे प्रत्येक समाजाची प्रगती होत असून पंतप्रधान मोदी यांची जादू देशभरातच नाही तर जगभरात कायम रहाणार असा विश्वासही श्री. चव्हाण यांनी व्यक्त केला. बिहार निवडणुकीचे निकाल पाहता आगामी महापालिका निवडणुकीत मुंबईत काय होणार याची स्पष्ट कल्पना आत्तापासूनच येत आहे. मुंबईमध्ये पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात केंद्राकडून निधी मिळत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाच्या दृष्टीमुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलत आहे. महाराष्ट्राच्या पुढील पिढीच्या उज्वल भविष्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीचा विजय महत्वाचा आहे. केंद्राच्या प्रत्येक लोकोपयोगी योजनेचा लाभ ग्राम पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती,पालिका हद्दीतील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी आगामी निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील जनता महायुतीला नक्की आशीर्वाद देईल असा विश्वास श्री. चव्हाण यांनी व्यक्त केला

# वाढता मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी तळोदा वनविभागाची 'जन-वन सुरक्षा मोहीम'

## सुरक्षितता आणि सहजीवनासाठी वन विभागाचा गावोगावी थेट संवाद

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्यातील वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सावधानता आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी मेवासी वनविभाग, तळोदा यांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. उपवनसंरक्षक चव्हाण आणि सहाय्यक वनसंरक्षक आडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच तळोदा वनपरिक्षेत्र अधिकारी शंतनु सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली 'जन-वन सुरक्षा अभियान' या लोकहितकारक मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या अभियानांतर्गत वन विभागाची टीम व्यापक स्तरावर जनजागृती करत आहे. प्राथमिक टप्प्यात शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना वन्यजीवनाचे महत्त्व, तसेच बिबट्यासारख्या हिंस्त्र प्राण्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबद्दल सविस्तर माहिती दिली जात आहे. वन्यप्राण्यांशी सामना झाल्यास काय करावे आणि काय करू नये. शेतात काम करताना घ्यावयाची विशेष काळजी (उदा. समूहात काम करणे). लहान मुलांसाठी वन्यजीव-सुरक्षा नियम. येत्या काही दिवसांत वन विभागाची टीम शहरांपुरती मर्यादित न राहता, गावा-गावांत, शेतीच्या बांधावर जाऊन थेट संवाद साधणार आहे. ऊसतोडणी कामगार, शेतमजूर आणि स्थानिक नागरिक हेच या संघर्षाचे मुख्य केंद्रस्थान असल्याने, त्यांना प्रत्यक्ष भेटून मार्गदर्शन केले जाणार आहे.

या मोहिमेत वनपाल अर्पणा लोहार यांच्यासह वनरक्षक (एन. एन. डोगरे, आर. डी. कोकणी, एस. बी. भंडारी, व्ही. जे. पावरा, जे. बी. पाडवी, जी. पी. पावरा, एम. एच. तडवी, ए. जी. पावरा, ए. वी. वसावे) यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे.

वन विभागाच्या या दूरदर्शी आणि सक्रिय भूमिकेमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक बदल घडून मानव-वन्यजीव संघर्षात मोठी घट होण्याची आशा निर्माण झाली आहे.



### वनविभागाचे नागरिकांना आवाहन

**वन्यप्राण्यांच्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी समूहात शेतीचे काम करा. तसेच, शेत शिवारात कोणताही हिंस्त्र प्राणी दिसल्यास नागरिकांनी घाबरून न जाता, थेट वन विभागाशी त्वरित संपर्क साधावा. शांतता आणि सहकार्यानेच आपण हा संघर्ष कमी करू शकतो.असे आवाहन करण्यात आले आहे.**

# विभागीय शिक्षण उपसंचालक कैलास दातखिळ यांचा मुप्टा (MUPTA) बीड जिल्हावतीने सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

नवनियुक्त विभागीय शिक्षण उपसंचालक मा. कैलास दातखिळ साहेब यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल, महाराष्ट्र अंडर प्रिव्हेल्जड् टीचर्स असोसिएशन (चणझढ-) या शिक्षक संघटनेच्या बीड जिल्हा कार्यकारिणीने त्यांचा यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मा.कैलास दातखिळ साहेब यांच्या विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रातील प्रश्न मार्गी लागतील आणि शिक्षकांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा मुप्टा संघटनेने व्यक्त केली.




यावेळी मुप्टा शिक्षक संघटना, बीड जिल्हा कार्यकारिणीतील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्ह्याचे सचिव प्रा. शशिकांत जावळे, जिल्हाध्यक्ष (ज्युनियर) प्रा. नारायण घोलप, जिल्हाध्यक्ष (माध्यमिक) प्रवीण तरकसे, आणि डॉ. संजय मुरूमकर यांच्या हस्ते मा. कैलास दातखिळ साहेब यांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला.

सत्काराच्या वेळी, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक साहेबांना बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या व मागण्यांविषयी माहिती दिली. यावर सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन मा. दातखिळ साहेबांनी जिल्हाध्यक्ष शरदराव मगर यांना दिले, अशी माहिती मुप्टा संघटनेकडून देण्यात आली.

मा. कैलास दातखिळ साहेब यांचा शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि कार्यशैली पाहता, त्यांच्या नेतृत्वाखाली विभागातील शिक्षणाचे स्तर उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास मुप्टा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# ठाकर आडगाव येथे विहीर ढासाळून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील बेलगुलवाडी येथील शेतकरी कचरू रावजी कोकाट यांच्या बेलगुलवाडी येथील गट नंबर ९४ मधील शेतातील विहीर अतिवृष्टीमुळे ढासळली असून,पूर्ण प्रमाणात गाडली गेल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. बेलगुलवाडी शिवारा मधे काही दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नदीला पाणी आले होते मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता.या पाण्यामुळे बेलगुलवाडी शिवारातील शेतकरी कचरू रावजी कोकाट यांच्या विहिरीच्या वरून मोठ्या प्रमाणात पाणी गेल्या मुळे नुकसान झाले होते ते आज दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी शेतकरी शेतात गेले तर त्यांना पूर्णपणे विहीर ढासळलेली आढळलीकोकाट यांच्या शेतातील विहिरीचे बांधकाम झालेलं पूर्णपणे ढासळून विहिरीत पडला आहे. विहीर पूर्ण गाडली गेली असून, साडेसात एचपीची एसी मोटार चा पूर्ण पाईप,स्टार्टर,वायर, तसेच ३ एचपी शक्ती कंपनी चे सोलर मोटर पाईप वायर सौर पॅनलअसा पूर्ण संच विहिरीमध्ये पूर्णपणे गाडला गेला आहे त्यामुळे शेतकरी यांचे लाखोचे नुकसान झाले आहे तिचे पाणी सर्वत्र शेतात पसरत आहे.आता विहिरीतील गाळ काढण्यासाठी तसेच बांधकामासाठी लाखोंनी खर्च लागणार असल्यामुळे शेतकरी चिंतेत पडले आहे महसूल प्रशासन तसेच तलाठी यांनी लवकरात लवकर पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी कोकाट यांनी केली आहे



# खा.बजरंग सोनवणे यांनी पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दिपक देशमुख यांचे नाव जाहीर

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

**प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन हासिना जब्बार सय्यद आदी नगरसेवक पदाचे उमेदवारही जाहिर**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाची परळी काल पत्रकार परिषद खा. बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी, पक्षाचे निरिक्षक नरेंद्र काळे, प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड , नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख,माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, जीवनराव देशमुख, उत्तम माने,तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, अँड.माधव जाधव शहराध्यक्ष सय्यद फिरोज आदींची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यापूर्वीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणाच्या ताब्यात आहे कसा आहे कुणाला सांगण्याची गरज नाही. दरम्यान लोकसभेला सर्वांनी काम केल्याचे कार्यकर्त्यांचे कौतुक खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन मधून हासिना जब्बार सय्यद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्याताई देशमुख यांची नावे यावेळी जाहीर करण्यात आली. परळीतून लोकसभेला मोठ्या मताधिक्याने मतदान झाले असून विधानसभेत अपघात वगळता दहशत वगैरे असल्यामुळे चांगले यश मिळू शकले नाही. महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढू, महाविकास आघाडीत कुणी वेगळे लढत असेल तर त्याची मनधरणी करून एकत्रित लढण्याचा प्रयत्न करणारा असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परळी तालुका व बीड जिल्हा शरद पवारांना मानणारा आहे.जनतेने साथ द्यावी आणि २ डिसेंबरला मतदान करून निवडून द्यावे, असे आवाहन यावेळी पत्रकार परिषदेत संबोधन करताना खासदार बजरंग सोनवणे केले. यावेळी पत्रकारांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

# खांडी पिंपळगाव जि.प.शाळेत वर्ल्ड विजन संस्थेतर्फे जागतिक बाल दिन साजरार




**दैनिक वादळ वार्ता**
**बाळु श्रीखंडे । प्रतिनिधी**

दिनांक १४ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद शाळेमध्ये वर्ल्ड विजन संस्थे तर्फे जागतीक बाल दिन साजरा करण्यात आला पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांनी चाचा नेहरू यांच्या जीवनाविषयी भाषण केले तसेच संस्थेच्या वतीने बालकांचे विविध कायदे आणी अधिकार, लैंगिक समानता,बालविवाह, बालमजुरी,चाईल्ड हेल्प लाईन १०९८ याविषयी सखोल माहिती देण्यात आली. यावेळी वर्ल्ड विजन संस्थेचे श्रीम चमूला वळवी, ज्ञानेश्वर देवकर शालेय मुख्याध्यापक श्री काळे सर,श्रीखंडे सर,माळी सर,भंडारी सर,चौधरी, श्रीम खरात व चव्हाण मॅडम हजर होते.

# निवडणुकांच्या तोंडावर आयोगाचा दणका! दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना 'ब्रेक'; इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर पूर्वप्रमाणन बंधनकारक

## जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण समिती कार्यान्वित; नियम मोडल्यास कठोर कारवाईचे संकेत

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये माध्यमांच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि मतदारांची दिशाभूल टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. आता इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर कोणतीही निवडणूक विषयक जाहिरात प्रसारित करण्यापूर्वी पूर्वप्रमाणन घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती तात्काळ कार्यान्वित करण्यात आली आहे.

जिल्हा माहिती अधिकारी तथा जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण समिती चे सदस्य सचिव रणजितसिंह राजपूत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ही महत्त्वपूर्ण माहिती दिली. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि सर्व राजकीय पक्षांना समान संधी मिळावी, हा आयोगाचा उद्देश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

समितीने काही विशिष्ट प्रकारच्या जाहिरातींना पूर्वप्रमाणन न देण्याचे स्पष्ट केले आहे. यामध्ये प्रामुख्याने धर्म, जात, भाषा, लिंग यावर आधारित द्वेष निर्माण करणारे संदेश, प्रार्थनास्थळांचे फोटो/व्हिडिओ, संरक्षण दलाचे फोटो/व्हिडिओ किंवा हिंसेला प्रोत्साहन देणाऱ्या सामग्रीचा समावेश आहे. अशा प्रकारची सामग्री आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा पक्षावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

इलेक्ट्रॉनिक मीडिया जाहिरात प्रसारित करण्याच्या किमान ५ कामकाजाचे दिवस आधी अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर झाल्यानंतर ३ दिवसांत तो निकाली काढला जाईल. जाहिरात खर्च उमेदवाराच्या किंवा पक्षाच्या निवडणूक खर्चात स्पष्टपणे नोंदवणे बंधनकारक आहे. तसेच, जाहिरात खर्चाची देयके केवळ चेक/ऑनलाइन/ड्राफ्टद्वारेच दिली जातील, रोखीने स्वीकारली जाणार नाहीत. पत्ता: अर्ज जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार येथील जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण समिती समितीकडे सादर करावा लागेल. इलेक्ट्रॉनिक माध्यमांप्रमाणे मुद्रित जाहिरातींना पूर्वप्रमाणन आवश्यक नसले तरी, प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता आणि प्रत संख्या नमूद करणे अनिवार्य आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास 'प्रेस ॲक्ट' नुसार कारवाई होणार आहे. रणजिसिंह राजपूत यांनी स्पष्ट केले की, जरी जाहिरात प्रमाणित असली तरी, जर ती नंतर आचारसंहितेचा भंग करत असल्याचे आढळले, तर आयोग किंवा निवडणूक निर्णय अधिकारी ती जाहिरात तात्काळ थांबवण्याचे आणि दोषींवर कायदेशीर कारवाईचे आदेश देऊ शकतात.निवडणुकीत निष्पक्षता, पारदर्शकता आणि कायद्याचे रक्षण करण्यासाठी जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण समिती समिती 'वॉचडॉग' म्हणून काम करेल, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077